# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:20.04.2025** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या**

१. पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी दोन दिवसांच्या सौदी अरेबिया दौऱ्यावर रवाना होणार

२. मुस्लिम सहकार्य संघटनेचा भारताविरुद्ध अपप्रचारासाठी गैरवापर करत असल्याबद्दल भारताची पाकिस्तानवर प्रखर टीका

३. ईस्टरच्या सणानिमित्त राष्ट्रपती -उपराष्ट्रपतींच्या देशातील ख्रिस्ती धर्मीयांना शुभेच्छा,

४. ईस्टरनिमित्त युक्रेनमध्ये तीस तासांच्या युध्दविरामाची रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांची घोषणा आणि

५. आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल झालेल्या सामन्यांमध्ये गुजरात टायटन्स आणि लखनौ सुपर जायंट्स हे संघ विजयी

**पीएम सौदी दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या सौदी अरेबिया दौऱ्यासाठी येत्या मंगळवारी जेद्दाह इथं पोहोचतील. भारताच्या पंतप्रधानांची या शहराला गेल्या जवळपास चार दशकांतली ही पहिलीच भेट असणार आहे. यापूर्वी 1982 मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या शहराला भेट दिली होती. ही भेट भारत-सौदी अरेबिया यांच्यातील संबंधांमध्ये झालेला उल्लेखनीय़ बदल अधोरेखित करणारी आहे. सुरुवातीला उभय देशांमध्ये असलेल्या माफक सबंधांचं आता आर्थिक, संरक्षण आणि सांस्कृतिक सहकार्याच्या रुपानं सर्वंकष धोरणात्मक भागीदारीत रुपांतर झालं आहे. आजमितीस जेद्दाह हे सौदी अरेबियामधलं दुसरं सर्वात मोठं शहर असून तांबड्या समुद्रालगत असलेलं महत्त्वाचं व्यावसायिक केंद्र आहे. मुस्लिम धर्मीयांच्या मक्का आणि मदीना या दोन पवित्र स्थळांचं प्रवेशद्वार म्हणूनही या शहराची ओळख आहे .

**भारत पाकिस्तान टीका**

पाकिस्तान मुस्लिम सहकार्य संघटना अर्थात OIC या व्यासपीठाचा भारताविरुद्ध अपप्रचार करण्यासाठी गैरवापर करत असल्याबद्दल भारतानं जोरदार टीका केली आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव विक्रम मिस्री यांनी काल संध्याकाळी नवी दिल्ली इथं घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना ही पाकिस्तानची जुनीच खोड असल्याचं नमूद केलं. याबाबत भारतानं वरचेवर पाकिस्तानला हे बोलून देखील दाखवलं आहे, तसंच OIC मधील मित्र आणि भागीदार देशांपाशीही हा मुद्दा उपस्थित केला आहे. भारत आपले दृष्टिकोन आणि पाकिस्तानची या सवयीबद्दल भारताला नेमकं काय वाटतं हे अन्य सदस्य देशांच्या नजरेस आणून देत राहील असंही मिस्री यांनी सांगितलं.

**सीतारामन**

अर्थमंत्री निर्मला सीतारामन आजपासून अमेरिका आणि पेरु या दोन देशांच्या अधिकृत दौऱ्यावर असणार आहेत. अमेरिकेतल्या सान फ्रान्सिस्कोच्या दोन दिवसांच्या भेटीत स्टॅनफोर्ड विद्यापीठातल्या हूव्हर संस्थेत त्यांचं बीजभाषण होणार आहे. त्या व्यतिरिक्त त्या प्रमुख निधी व्यवस्थापन कंपन्यांच्या वरिष्ठ सीईओंशी संवाद साधणार आहेत तसंच माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीच्या कंपन्यांच्या सीईओंशीही त्या द्विपक्षीय चर्चा करणार आहेत. अमेरिकेत स्थायिक झालेल्या भारतीय समुदायाच्या कार्यक्रमातही त्या सहभागी होणार असून त्यांच्याशीही त्या संवाद साधतील.

**व्हान्स दौरा**

अमेरिकेचे  उप राष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हान्स चार दिवसांच्या भारत भेटीसाठी येत असून उद्यापासून अधिकृतपणे त्यांच्या या दौऱ्याचा प्रारंभ होणार आहे. व्हान्स यांचा हा पहिलाच भारत दौरा असल्याचं परराष्ट्र मंत्रालयाच्या निवेदनात म्हटलं आहे. त्यांच्या या दौऱ्याते ते उद्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेणार आहेत. उपाध्यक्ष व्हान्स आणि त्यांच्यासमवेत असलेलं शिष्टमंडळ यांच्या दिल्लीत इतरही काही भेटीगाठी होणार आहेत. तसंच ते जयपूर आणि आग्रा या शहरांनाही भेट देणार आहेत. व्हान्स यांच्या या दौऱ्याच्या निमित्तानं दोन्ही देशांना द्विपक्षीय संबंधांमध्ये झालेल्या प्रगतीचा आढावा घेता येणार आहे. याशिवाय दोन्ही देश आपल्या परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींबद्दल आपल्या भूमिकाही एकमेकांपाशी मांडतील.

**ईस्टर**

आज जगभरात ईस्टरचा सण साजरा केला जात आहे. गुड फ्रायडेला प्रभू येशू ख्रिस्तांना क्रूसावर चढवण्यात आल्यानंतर रविवारी त्यांचं पुनरुत्थान झालं, असं मानलं जातं त्या घटनेचं स्मरण म्हणून ईस्टर हा सण साजरा केला जातो. ईस्टरनिमित्त चर्चमध्ये विशेष प्रार्थना सभा आयोजन करण्यात येत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी यानिमित्त सर्वांना, विशेषतः देशात आणि परदेशातील राहणाऱ्या ख्रिश्चन समुदायाला शुभेच्छा दिल्या आहेत.  ईस्टरचा पवित्र सण निस्वार्थ प्रेम आणि सेवेचा संदेश  देतो. येशू ख्रिस्तांचं बलिदान, हे त्याग आणि क्षमा या मूल्यांचा आदर्श असून त्यांचं जीवन मानवतेला सत्य, न्याय आणि करुणेच्या मार्गावर चालण्यास प्रेरित करतं,असं राष्ट्रपतींनी आपल्या ईस्टरच्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. करुणा, क्षमा आणि सेवेची येशू ख्रिस्तांची कालातीत शिकवण नागरिकांना सुसंवादी समाज निर्माण करण्यासाठी मार्ग दाखवणारी असल्याचं उपराष्ट्रपती धनखड यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**ईस्टर युद्धबंदी**

ईस्टरचा सण साजरा होत असल्यानिमित्त रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी युक्रेनमध्ये 30 तासांच्या युद्धबंदीची घोषणा केली आहे. पुतीन यांनी आपल्या सैन्याच्या तुकड्यांना भारतीय प्रमाण वेळेनुसार उद्या पहाटे अडीच वाजेपर्यंत सर्व प्रकारच्या लष्करी कारवाया थांबवण्याच्या सूचना दिल्या आहेत. मानवतावादी भावनेतून हा युद्धविराम लागू करण्यात येत असून युक्रेनही या युद्धबंदीचं पालन करेल, अशी अपेक्षा व्यक्त करतानाच त्याचा भंग झाल्यास रशियाचं सैन्य त्याला प्रत्त्युत्तर देण्यास तयार असेल, असंही त्यांनी पुढे सांगितलं.  दरम्यान युक्रेनचे अध्यक्ष वोल्दोमीर  झेलेन्स्की यांनी रशियाला खरोखर तसं वाटत असेल तर या युद्धबंदीचा मान राखला जाईल, असं म्हटलं

आहे. तथापि काही भागात सध्या सुरू असलेला संघर्ष आणि ड्रोनच्या हालचाली सुरू राहतील असंही झेलेन्स्की यांनी नमूद केलं.

**भाजपा-वक्फ**

अलीकडेच मंजूर झालेल्या वक्फ सुधारणा कायद्यामुळे होणाऱ्या फायद्यांविषयी, विशेषतः मुस्लिमांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी भारतीय जनता पक्ष उद्यापासून 5 मे पर्यंत देशव्यापी मोहीम राबवणार आहे. नवी दिल्ली इथल्या पक्षाच्या मुख्यालयात अलीकडेच देशभरातील भाजप पदाधिकाऱ्यांची कार्यशाळा पार पडली. त्यामध्ये पक्षाचे अध्यक्ष जे.पी. नड्डा यांनी केवळ मतपेढीच्या राजकारणासाठी सुधारित कायद्यातील तरतुदींबद्दल मुस्लिमांची दिशाभूल केली जात असल्याचा विरोधी पक्षांवर आरोप केला होता. वक्फच्या मालमत्तांचं पारदर्शक आणि कार्यक्षम व्यवस्थापन करून त्यांच्या व्यवस्थापन आणि कल्याणकारी कार्यक्रमांमध्ये 'पसमंदा' अर्थात मागास मुस्लिम आणि महिलांना सहभागी करून घेण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारनं संकल्प केल्याचं त्यांनी सांगितलं. या एकदिवसीय कार्यशाळेत भाजपशासित राज्यांमधील वक्फ बोर्डांचे सदस्य आणि पक्षाच्या अल्पसंख्याक शाखेचे पदाधिकारी सहभागी झाले होते.

**बंगाल राज्यपाल**

पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद जिल्ह्यात झालेल्या जातीय हिंसाचाराच्या घटनेच्या मुद्द्यावर आपण मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याशी चर्चा करणार आहोत, तसंच तिथल्या प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केल्यानंतर आपल्याला आढळलेल्या गोष्टींचा अहवालही केंद्र सरकारला सादर करणार असल्याचं राज्यपाल सीव्ही आनंद बोस यांनी म्हटलं आहे. मुर्शिदाबादमधल्या हिंसाचारग्रस्त भागाचा दौरा करून कोलकाता इथं परतत असताना पत्रकारांशी बोलताना त्यांनी ही माहिती दिली.

**नक्षल**

छत्तीसगडमधील नारायणपूर इथं चार महिलांसह पाच नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली असून, 20 नक्षलवाद्यांनी शस्त्र समर्पण केल्याची माहिती आयटीबीपी अर्थात इंडो तिबेटीयन बॉर्डर पोलिसांनी दिली. छत्तीसगडच्या सुकमा इथं पोलीस अधीक्षक किरण चव्हाण यांच्या उपस्थितीत नऊ महिलांसह 22 नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली. आत्मसमर्पणानंतर सुकमाचे पोलिस अधीक्षक किरण गंगाराम चव्हाण म्हणाले की, आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांना सरकारच्या आत्मसमर्पण धोरणांतर्गत सर्व लाभ मिळतील. या महिन्याच्या सुरुवातीला दंतेवाडा इथं 26 माओवाद्यांनी पोलिस आणि सीआरपीएफ म्हणजेच केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर शरणागती पत्करली होती.

**वेव्हज**

वेव्ज परिषदेअंतर्गत काल मुंबईत कॉसप्ले स्पर्धेची पहिली फेरी घेण्यात आली. यामध्ये देशभरातील सर्वोच्च पन्नास कॉसप्लेयर्सनी भाग घेतला. कॉस्प्ले म्हणजे, "वेशभूषा खेळ", यामध्ये कॉस्प्लेअर्स नावाचे सहभागी विशिष्ट पात्रं सादर करण्यासाठी विविधांगी पोशाख आणि फॅशनच्या वस्तू परिधान करतात.

**आयपीएल निकाल**

आयपीएल टी-ट्वेंटी क्रिकेट मालिकेअंतर्गत अहमदाबाद इथं काल झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्सनं दिल्ली कॅपिटल्स संघाचा 7 गडी राखून पराभव केला. दिल्लीनं प्रथम फलंदाजी करताना 20 षटकांत 203 धावा केल्या. गुजरातनं 19 षटकांत 204 धावा करत विजय मिळवला. जयपूर इथं झालेल्या दुसऱ्या सामन्यात, लखनौ सुपर जायंट्सनं राजस्थान रॉयल्सला दोन धावांनी हरवलं. विजयासाठी 181 धावांचं लक्ष्य गाठताना राजस्थान रॉयल्स निर्धारित षटकांत पाच गडी बाद 178 धावाच करु शकला.

**हवामान**

विदर्भात पुढील तीन दिवस उष्णतेच्या लाटेची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली असून मध्य महाराष्ट्रात आज आणि गुजरातमध्ये बुधवारपर्यंत उष्ण आणि दमट हवामान राहील, असा अंदाज हवामान खात्यानं वर्तवला आहे. जम्मू-काश्मीर-लडाख-मध्ये उद्यापर्यंत बहुतांश ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसंच उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशातही उद्यापर्यंत वादळी वाऱ्यासह अशाच स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे. येत्या पाच दिवसांत अरुणाचल प्रदेश, आसाम आणि मेघालयमध्ये मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार**